केसरी रविवार
दि. १० ऑक्टोबर २०२१

**श्रुती आणि शास्त्रांनी श्रेष्ठ मानलेली विद्वानांची माता, वाणीची अधिष्ठात्री देवता सरस्वती हीच कवींचीही इष्ट देवता आहे. विजया दशमीच्या दिवशी सरस्वतीची पूजा करायची, ती ज्ञानसत्तेचे महत्त्व मनी रुजविण्यासाठीच ! आजच्या ललिता पंचमीच्या निमिताने विशेष**



# ॥ शतरूपा वागीश्वरी ॥

भालचंद्र गुजर

आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना करून आरंभ झालेल्या नवरात्रीची सांगता दहाव्या दिवशी दसऱ्याला होते. दुर्गामातेने शुंभ, निशुंभ, रक्तबीज आणि महिषासुर या राक्षसांशी नऊ दिवस नऊ वेगवेगळे अवतार घेऊन युद्ध केले. नवरात्रीच्या दिवसांत दुर्गा, भद्रकाली, जगदंबा, अन्नपूर्णा, चंडिका, सर्वमंगलम, भैरवी, भवानी, चंडीमाता अशा नऊ देवींचे रोज एक याप्रमाणे पूजन करतात. दहाव्या दिवशी देवीने या राक्षसांवर विजय मिळवला. या विजयाची स्मृती म्हणून आश्विन शुद्ध दशमीला 'विजयादशमी' म्हणतात. आसुरी शक्तीवर दैवी शक्तीचा विजय हा अन्वयार्थ असलेला हा दिवस शक्तिपूजनाचा पर्वकाळ समजला जातो. या दिवशी शस्त्रपूजा केली जाते, तसेच नव्या कार्याचा आरंभ संपन्न होतो.

चैत्री पाडवा (चैत्र शुद्ध प्रतिपदा), अक्षय्य तृतीया (वैशाख शुद्ध तृतीया), विजया दशमी (आश्विन शुद्ध दशमी) आणि दिवाळीतील बलिप्रतिपदा (कार्तिक शुद्ध प्रतिपदा – अर्धा मुहूर्त) हे साडेतीन मुहूर्त आहेत. दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजा केली जाते. कारण पूर्वी या दिवशी शस्त्रपूजा करून राजे–महाराजे दुसऱ्या दिवशी नव्या मोहिमांवर निघत असत. महाराष्ट्राच्या इतिहासात शस्त्रपूजेला आणि सीमोल्लंघनाला फार महत्त्व होते. दसऱ्यापूर्वी पावसाळ्यात चार महिने लष्करी माहिमा थांबवून सैन्य शेती करीत असे किंवा विश्रांती घेत असे आणि मग शस्त्रसज्ज होऊन पुन्हा युद्धभूमीवर लढण्यासाठी जात असे. दसऱ्याच्या शस्त्रपूजेचा आणि सीमोल्लंघनाचा असा हा संदर्भ आहे.

दसऱ्याच्या दिवशी शमीपूजन किंवा आपट्याच्या झाडाची पूजा केली जाते. शमी वृक्षाजवळ 'अपराजिता' देवीची प्रतिमा रेखाटून तिचीही पूजा होते. पांडवांनी अज्ञातवासात असताना शमीवृक्षाच्या ढोलीत ठेवलेली शस्त्रे काढून विराटाच्या गायींचे अपहरण करणाऱ्या कौरवांवर स्वारी केली व त्यांचा पराभव केला. त्या प्रसंगाचे स्मरण म्हणून हे शमीपूजन. आपल्या गुरूला चौदा कोटी सुवर्णमुद्रांची दक्षिणा देण्यासाठी कौत्साने रघुराजाला विनंती केली. रघुराजाने सरळ स्वर्गातील कुबेरावर स्वारी केली. त्यामुळे भयग्रस्त झालेल्या कुबेराने याच दिवशी शमीच्या झाडावर सुवर्णवृष्टी केली. आवश्यक तेवढे सोने रघुराजाने कौत्साला दिले आणि उरलेले प्रजानांना वाटले, अशी कथा 'स्कंद पुराणा'त आहे. आज आपण शमीची किंवा आपट्याची पाने दसऱ्याच्या दिवशी 'सोने' म्हणून एकमेकांना देतो, त्यामागे हाच संदर्भ आहे.

दसऱ्याच्या दिवसाला आणखी एक संदर्भ आहे तो सरस्वती पूजनाचा. भारतीय संस्कृतीत एक श्रेष्ठ देवी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरस्वतीचा उल्लेख 'वाक', 'वागीश्वरी', 'वाणी', 'शारदा', 'विशाल', 'शतरूपा' असा प्राचीन वाङ्मयातून आढळतो. 'अमरकोशा'त 'भारती' व 'भाषा' अशी सरस्वतीची नावे आहेत; तर 'शब्दरत्नावली' या ग्रंथात सरस्वतीला 'इरा', 'शारदा', 'गिरा', 'गीर्देवी' असे संबोधले आहे. 'ब्रह्मवैवर्त'त सरस्वतीला 'वाक्येश्वरी' आणि 'सायंसंध्यादेवता' असे म्हटले आहे. संस्कृत भाषेत सरस्वतीची व्याख्या 'सरी नीरं तद्वत रसो वास्तपतस्य इति सरस्वती' अशी केलेली आहे. राधा, पद्मा, सावित्री, दुर्गा आणि सरस्वती अशा पाच शक्ती आहेत. वैदिक आर्यांनी सप्तसिंधू प्रदेशात (म्हणजे सध्याच्या पंजाब प्रांतात) वस्ती केली, तेव्हा त्यांनी सिंधू, शरयू आणि सरस्वती या तीन महत्त्वाच्या नद्या मानल्या. त्यातही सरस्वती ही सर्वश्रेष्ठ होती. वेदोत्तर काळात मात्र ती गुप्त झाली. वैदिक काळात नद्यांना पूज्य मानले जात असे. आर्यांनी सरस्वतीला मानवी रूप दिले आणि सर्व देवतांची सम्राज्ञी असे तिला मानले. उपनिषदांची रचना करण्यात आली, तेव्हा सरस्वती म्हणजे वाणी असा तिचा उल्लेख केला गेला. प्रज्ञावृद्धी आणि वाणीत गोडवा येण्यासाठी उपनिषदांमध्ये सरस्वतीची प्रार्थना आढळते. अस्खलित वाणीशी नदीच्या प्रवाहाची तुलना करण्याची पद्धत याच काळात प्रचलित झाली. सरस्वती या शब्दाची उत्पत्ती 'सृ' या धातूपासून झाली असून, त्याचा अर्थ 'गतिमती' असा आहे. ब्रह्मा, विष्णू आणि महेश म्हणजे शंकर हे अनुक्रमे उत्पत्ती, स्थिती आणि विनाश यांचे देव आहेत. या तिन्ही देवांना ज्ञान आणि भावाची आवश्यकता आहे. भावरहित निर्मिती, ज्ञानाशिवाय प्रतिपालन आणि कारण न जाणून घेता केलेला संहार अनर्थ निर्माण करतात. त्यामुळे कोणत्याही कार्याला आरंभ करताना म्हणजे सर्जनशीलता कार्यान्वित करताना आणि कार्य पूर्ण करीत असताना सरस्वतीच्या आशीर्वादाची नितांत आवश्यकता असते. सरस्वतीला वंदन करायचे ते यासाठीच.

सरस्वतीचा उल्लेख उपनिषदात वाणीशी संबंधित केला गेल्याने तिला 'वाग्देवी' म्हणतात. काळाच्या ओघात सरस्वती ही स्फूर्तिदेवता आणि विज्ञान व साहित्य यांची प्रतीक झाली. तैत्तिरिय उपनिषदात तर वाणीलाच सरस्वती म्हटले आहे. सरस्वती ही ललित कलांची अधिष्ठात्री आहे, तसेच चौसष्ट कलांची जाणकारही आहे. पुराणग्रंथांनी तिचे वर्णन मातृदेवता असे केले. पुढे ती शक्तिदेवता झाली आणि नंतर तिची ज्ञानाची देवता अशी प्रतिमा निर्माण केली गेली. सरस्वतीला 'वाक्‌देवता' म्हटले जाते, त्याला संदर्भ आहे तो रामायणाचा ! रावणाचा भाऊ असलेल्या कुंभकर्णाने ब्रह्मदेवाची आराधना करण्यास सुरुवात केली. त्यामुळे ब्रह्मदेव काळजीत पडले. कुंभकर्णाला वर देणे त्यांना भागच होते. कारण त्याची तपश्चर्या तशीच घोर होती. या आपत्तीपासून देवलोकाचे संरक्षण करण्यास फक्त सरस्वतीच समर्थ होती. ती ब्रह्मदेवाला म्हणाली, 'ठीक आहे ! कुंभकर्णाला वर मागू द्या. त्या वेळी मी त्याच्या मुखात असेन आणि त्याच्या वाणीतून देवांना त्रास होईल असा शब्द बाहेर पडू देणार नाही.' कुंभकर्णाला वर मागायचा होता 'निर्देवत्व'चा म्हणजे देवांच्या नाशाचा; पण ऐन वेळी सरस्वतीने त्याची जीभ शब्दांचा उच्चार करताना वेगळ्या वळणाने वळू दिली आणि त्याने वर मागितला 'निद्रात्वा'चा म्हणजे झोपेचा. ब्रह्मदेवांनी वर दिला आणि त्या क्षणापासून कुंभकर्णाची जगप्रसिद्ध झोप सुरू झाली.

सरस्वतीच्या उत्पत्तीविषयी पुराणात अनेक कथा आहेत; पण त्यात एकवाक्यता मात्र नाही. सरस्वती ही नेमकी कुणाची कन्या किंवा पत्नी यांविषयी वेगवेगळी मते संस्कृत ग्रंथांतून व्यक्त होताना दिसतात. १८७१ मध्ये संस्कृत अभ्यासक जॉन गॅरेट याने 'क्लासिकल डिक्शनरी ऑफ इंडिया' हा ग्रंथ प्रकाशित केला होता. त्यात सरस्वती ही महर्षी सारस्वत याची आई असल्याचा उल्लेख आहे. असे सांगतात की, फार पूर्वी भयंकर दुष्काळ पडला असता ब्रह्मवृंद आपल्या उदरनिर्वाहाच्या पूर्तेत एवढा मग्न झाला की, त्याने वेदाध्ययन करणे सोडून दिले. त्यामुळे वेद आणि इतर विद्या विस्मृत होऊ लागल्या. अशा वेळी सारस्वत ऋषींची आई असलेल्या सरस्वतीने मत्स्य आहाराने सारस्वतांचे उदरभरण केले. सारस्वतांनी उदरभरणाची चिंता मिटल्याने वेदाध्ययन तसेच चालू ठेवले. पुढे दुष्काळ संपला आणि अन्नसमृद्धी आल्यावर सारस्वत ऋषींनी ब्राह्मण वर्गास वेदांचे ज्ञान दिले. अशी ही फारशी प्रचलित नसलेली कथा 'विष्णु पुराणा'त आहे. सर्वसाधारणपणे सरस्वती ही ब्रह्मदेवाची मानसकन्या समजली जाते. शतरूपा हे तिचे नाव. देवी भागवत या ग्रंथात सरस्वतीची उत्पत्ती श्रीकृष्णाच्या मुखातून झाल्याचे सांगितले आहे; तर 'स्कंद पुराणा'त सरस्वती ही भगवान शंकराचे स्त्रीरूप असल्याचा उल्लेख आढळतो. याशिवाय सरस्वती ही इंद्र, धर्म, अग्नी, मनू आणि आश्विनीकुमार यांची पत्नी असल्याचेही उल्लेख आढळतात. आजमितीला आपण सरस्वती ही गणपतीची पत्नी मानतो आणि शुभकार्यारंभी गणपतीबरोबर तिचेही पूजन करतो. अर्थात असे असले, तरी कुलदेवता म्हणून तिचे पूजन होत नाही. त्यामुळे तिचे पूजाविधान आणि नित्यनैमित्तिक पूजा प्रचलित नाही. मात्र आश्विन नवरात्रीतील सप्तमी, अष्टमी व नवमी हे तीन दिवस सरस्वतीपूजनाचे मानतात.

हिंदू धर्माप्रमाणेच बौद्ध आणि जैन धर्मांतही ज्ञानाच्या देवतेची उपासना करण्याची प्रथा आहे. बौद्ध धर्मात मंजूश्रींची पत्नी ही ज्ञानाची देवता समजली जाते; तर जैन धर्मातील श्रुतदेवी म्हणजे सरस्वतीच ! विद्या आणि कलांना स्फूर्ती देणाऱ्या देवतांची संख्या पुरातन ग्रीक साहित्यात नऊ मानली गेली आहे. त्यांपैकी 'म्यूस' ही सर्व कलांची आई तसेच स्मरणशक्तीची देवता समजली जाते. 'कॅलिओप' ही देवता कवितांची, तर 'इराटो' ही प्रेमकवितांची आहे. 'क्लिओ' ही इतिहासाची; तर 'युतर्प' ही संगीताची देवता आहे. 'मेलपोमीन' ही शोकांतिकांची, 'पॉलिहायपीया' वंदनीय गाण्यांची, 'टर्पसिकोरा' नृत्याची, 'थालिया' विनोदाची आणि 'युरेनिया' ही खगोलशास्त्राची देवता मानली गेली आहे. हिंदू धर्मात सरस्वती ही एकच विद्येची देवता म्हणून सदासर्वकाळ पूजली जाते.

सरस्वती ही ज्ञानाची देवता मानल्याने तिच्या पूजनाने बुद्धी गतिमान होऊन ज्ञानाची प्राप्ती होते, असे समजले जाते. बुद्धीचे जाड्य आणि अज्ञानाचा अंधारही ती दूर करते; अरसिक माणसाला कलावान करते. अज्ञानी कालीदासाने सरस्वतीची आराधना करून तिला प्रसन्न करून घेतले आणि नंतर संस्कृत साहित्यात मानदंड ठरणाऱ्या वाङ्मयाची त्याने निर्मिती केली. सरस्वतीच्या रूपाविषयी अनेक उल्लेख संस्कृत साहित्यात आढळतात. कुंदकळ्या, चंद्र आणि हिमतुषार यांची उपमा सरस्वतीच्या वर्णाला दिली आहे. ती 'शुक्लवर्णा' म्हणजे गौर वर्णाची, पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेली 'श्वेतवस्त्रधारिणी' आणि वीणावादन करणारी 'वीणावादनतत्परा' आहे. तिचे चार हात चार दिशांचे प्रतीक आहेत. एका हातातील पुस्तक ज्ञानाचे, दुसऱ्या हातातील स्फटिकाची माळ सात्त्विकतेचे आणि ईश्वरनिष्ठेचे प्रतीक आहे; तर दोन हातांतील वीणा तिची कलासक्त वृत्ती सूचित करते. सरस्वतीची विविध रूपे आहेत. द्विभूजा, चतुर्भुजा, षड्भुजा आणि दशभुजा अशी तिची रूपे आहेत. बौद्ध धर्मातील सरस्वती ही षड्भुजा आहे. बौद्ध आणि जैन परंपरेत मोर, तर हिंदू परंपरेत हंस हे सरस्वतीचे वाहन समजले जाते.

सरस्वतीचे आल्हाददायक आणि आश्वासक रूप वर्णन करणारे अनेक श्लोक संस्कृत साहित्यात आहेत. पैकी एक असा

**एक देवी शुक्लवर्णा**
**वीणापुस्तकधारिणी**
**कातिपूर्णेन्दु शोभढ्या**
**शरदपंकज लोचना ।**
**श्रेष्ठा श्रुतीनां शास्त्राणां**
**विदुषां जननी परा**
**वागाधिष्ठातृदेवी सा**
**कविनामिष्ट देवता ॥**

गौरवर्ण आणि हातामध्ये वीणा व पुस्तक धारण करणारी, तसेच कोट्यवधी चंद्रांची शोभा असणारी देवी सरस्वती ही कमलनयनी आहे. श्रुती आणि शास्त्रांनी श्रेष्ठ मानलेली विद्वानांची माता, तसेच वाणीची अधिष्ठात्री देवता सरस्वती हीच कवींचीही इष्ट देवता आहे. त्यामुळेच सरस्वती वंदना हे भारतीय ग्रंथांचे आद्य अक्षर आहे आणि म्हणूनच विजया दशमीच्या दिवशी सरस्वतीची पूजा करायची, ती ज्ञानसत्तेचे महत्त्व मनीमानसी रुजविण्यासाठीच !

✻✻✻

**गेल्या वर्षभरापासून शेतकरी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. केंद्र सरकार मात्र हे आंदोलन चिरडून टाकू पहात आहे. त्याचाच एक भाग म्हणून लखिमपूर इथे आंदोलकांना मोटारीखाली चिरडण्याचा प्रयत्न झाला. ही अत्यंत निषेधार्ह घटना आहे. या प्रकरणी कायदेशीर पध्दतीने आंदोलन करणाऱ्या प्रियांका गांधी आणि अन्य नेत्यांनाही जुमानण्यात आलं नाही**

# शेतकऱ्यांच्या आंदोलनात रक्तपात कुणासाठी?





**विशेष**

**अजित नवले**
(कृषि प्रश्नांचे अभ्यासक )

केंद्र सरकारने केलेले तीनही कृषी कायदे मागे घेण्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केलं आहे. प्रजासत्ताकदिनाची एकमेव घटना वगळता हे आंदोलन अतिशय शांतपणे चालू आहे. जगाच्या पाठीवर एकाच मागणीसाठी इतका प्रदीर्घ काळ सुरू असलेलं शेतकऱ्यांचं असं आंदोलन अपवादात्मकच असेल.

सुरुवातीला पंजाब, हरयानापर्यंत मर्यादित असलेलं आंदोलन आता देशव्यापी होऊ लागलं आहे. त्यातही आंदोलकांनी आता थेट सरकारविरोधात भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. पश्चिम बंगालच्या निवडणुकीत शेतकऱ्यांनी भाजपविरोधात भूमिका घेतली. आता उत्तर प्रदेशाच्या निवडणुकीचं रणशिंग फुंकलं जात असताना मुझफ्फरनगरच्या महापंचायतीच्या निमित्तानं शेतकऱ्यांचं मोठं आव्हान राज्य व केंद्र सरकारला दिसू लागलं आहे.

आतापर्यंत शेतकऱ्यांना खलिस्तानवादी, देशद्रोही ठरवून सरकार मोकळं झालं. आता आंदोलन चिरडण्याची भाषा वापरली जात आहे. हरयानाचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांचं वक्तव्य तर शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळणारं आहे. शेतकरी आंदोलनावर सर्वोच्च न्यायालयानं टीका केली असली, तरी शेतकऱ्यांच्या आंदोलनातून मार्ग कसा काढायचा आणि वर्षभर आंदोलन करूनही हाती काहीच लागत नसेल तर शेतकऱ्यांनी किती काळ शांत रहायचं, याचं उत्तर कुणीच देत नाही. शेतकऱ्याला बळीराजा म्हणायचं आणि त्याचाच बळी घ्यायचा, हे वेगवेगळ्या शेतकरी आंदोलनांवर झालेल्या गोळीबारातून पुढे आलं आहे.

आता जर एका केंद्रीय मंत्र्यांचा मुलगाच आंदोलकांना गाडीखाली चिरडत असेल तर हे अराजक आहे. लोकशाही व्यवस्थेला मूठमाती देऊन, एकाधिकारशाहीकडे जाणारा हा प्रवास असून, लोकशाहीप्रेमी नागरिकांनी त्याला वेळीच आवर घालण्यासाठी रस्त्यावर आलं पाहिजे. आज शेतकरी जात्यात आहे तर अन्य सर्व सुपात आहेत, याचं भान ठेवलं पाहिजे. उत्तर प्रदेशातल्या लखीमपूर खेरी इथे शांततामय मार्गानं आंदोलन करणाऱ्या चार शेतकऱ्यांना केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय मिश्र टेनी यांच्या मुलासह कार्यकर्त्यांचा समावेश असलेल्या मोटारींच्या ताफ्याने चिरडून ठार मारलं. काही शेतकऱ्यांना मोटारींखाली चिरडण्यात आलं. आंदोलक शेतकऱ्यांबद्दल अजय मिश्र टेनी यांनी अत्यंत आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. आम्हाला संधी मिळू द्या, शेतकऱ्यांना कसं सरळ करतो ते पहा, असं धमकी देणारं आणि आपल्या मनात नक्की काय आहे हे स्पष्ट करणारं विधान त्यांनी केलं होतं. या विधानाचा निषेध करण्यासाठी शेतकऱ्यांनी निदर्शनं आयोजित केली होती. उत्तर प्रदेशाचे उपमुख्यमंत्री केशव मौर्य आणि केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्र टेनी सभास्थळाकडे जात असलेल्या ठिकाणी निदर्शनं करून शेतकरी शांतपणे आपल्या घराकडे परतत होते. त्यावेळी टेनी यांचा मुलगा आशिष मिश्र टेनी आणि त्याच्या गुंडांनी या शेतकऱ्यांना अंगावर मोटारी घालून चिरडून टाकलं. ही घटना प्रातिनिधिक आहे. तीन काळे कायदे अंमलात आणण्यासाठी भाजपच्या नेतृत्वाने आता उघडपणे हिंसेचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे.

याच वेळी हरयानााचे मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांची ध्वनीफीत व्हायरल झाली आहे. आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना चोपून काढण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी हातात काठ्या घ्याव्यात. हजार हजार कार्यकर्त्यांनी हातात काठ्या घेऊन शेतकऱ्यांना बदडून काढावं, प्रसंगी जेलमध्ये जायची तयारी ठेऊन शेतकऱ्यांना चोपून काढावं, असे उपदेश मुख्यमंत्री आपल्या कार्यकर्त्यांना देताना या क्लिपमध्ये दिसत आहेत.

केंद्रीय गृह खात्याचे राज्यमंत्री आणि हरयानाचे मुख्यमंत्री शेतकऱ्यांना चोप देण्याची, धडा शिकवण्याची भाषा करत असतील तर शेतकऱ्यांकडून तरी संयमाची अपेक्षा कशी करता येईल? असं असताना शेतकरी शांतपणे आंदोलन करत आहेत. भाजपच्या नेत्यांपुढे निदर्शनं करत आहेत. काही दिवसांपूर्वी हरयानातल्या कर्नाल मतदारसंघात (हा मतदारसंघ मुख्यमंत्र्यांचा आहे) उपविभागीय अधिकाऱ्याचाही असाच वादग्रस्त ऑडीओ समोर आला. मुख्यमंत्र्यांसमोर निदर्शनं होऊ नयेत, यासाठी कर्नाल विभागाचे उपविभागीय अधिकारी आयुष सिन्हा यांनी अशाच प्रकारे आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची डोकी फोडा, असा आदेश पोलिसांना दिला होता. सत्ताधारी पक्षाच्या इशाऱ्याशिवाय असं बोलण्याचं धाडस कुणीही अधिकारी करणार नाही. गेले दहा महिने दिल्लीच्या सीमेवर शांततेच्या मार्गानं सुरू असलेलं शेतकरी आंदोलन भाजप कशा प्रकारे हाताळू पहात आहे हे यावरून स्पष्ट होतं.

प्रजासत्ताक दिनी संयुक्त किसान मोर्चानं आंदोलनाच्या समर्थनार्थ दहा लाख शेतकऱ्यांची ट्रॅक्टर रॅली आयोजित केली. त्या वेळीही भाजपने आंदोलनाला हिंसक वळण लावण्याचा पूर्ण प्रयत्न केला होता. भाजपचे हस्तक असलेल्या शेतकरी गटाला हाताशी धरून मिरवणुकीचा नियोजित मार्ग बदलून काही ट्रॅक्टर मुद्दाम लाल किल्ल्याच्या दिशेनं नेण्यात आले. प्रचंड बंदोबस्त असलेल्या लाल किल्ल्याची दारं या फितूर गटासाठी उघडण्यात आली आणि शेतकऱ्यांनी लाल किल्ल्यावर हल्ला केल्याच्या बनावट बातम्या प्रसारित करून आंदोलन हिंसक करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

बळाचा वापर सहज करता येत असल्याने हिंसक आंदोलन मोडून काढणं सोपं जातं. शेतकऱ्यांच्या चिंता आणि आक्षेप समजून घेऊन नव्हे तर हिंसा करूनच हे आंदोलन संपवायचं हे सरकारने आणि भाजपने जणू ठरवूनच टाकलं आहे. सरकार असा टोकाचा दुराग्रह सरकार का करत आणि कुणासाठी करत आहे हा प्रश्न या निमित्तानं उपस्थित होतो. सत्ताधारी भाजपचे व पक्षनेत्यांचे आर्थिक व राजकीय हितसंबंध सामावलेल्या बड्या कंपन्यांसाठीच सरकारचा हा टोकाचा रक्तपातपूर्ण दुराग्रह सुरू आहे. याकंपन्यांना शेती क्षेत्रात नफा कमावण्याची अमाप संधी दिसते आहे. शेतीमालाचं उत्पादन, खरेदी, वाहतूक, साठवणूक, प्रक्रिया, आयात, निर्यात आणि विक्री या संपूर्ण क्षेत्रात नफा संकलित करण्यासाठी या कंपन्यांनी सुनियोजित आखणी केली आहे. 'भुके'चा नफा कमावण्यासाठी 'शाश्वत' वापर कसा करायचा हे या कंपन्यांना माहीत आहे. जगभरच्या आपल्या भागीदार कंपन्यांनी विविध कृषिप्रधान देशांना तिथला शेतीमाल आणि अन्नावर कब्जा मिळवून कसं 'भुके कंगाल' केलं आणि स्वत: कशा 'मालामाल' झाल्या हे त्यांनी पाहिलं आहे. भारतात असंच करण्यासाठी कंपन्यांना भारतातल्या अन्न आणि शेतमालाच्या साठ्यावर 'निर्णायक मक्तेदारी' हवी आहे. 'कॉर्पोरेट' कंपन्यांनी यासाठी अजस्र अत्याधुनिक गोदामं उभी केली आहेत. देशभरातील हे सायलोस रेल्वे रुळांच्या माध्यमातून मुख्य लोहमार्गांना जोडण्यात आले आहेत. कृषी कायदे हे सायलोज भरण्यासाठीच आणण्यात आले आहेत. सायलोजच्या या विस्तृत साखळीच्या माध्यमातून हाती अन्नधान्याचा अमर्याद साठा आल्यास या कंपन्यांना शेतीमालाचे खरेदी भाव पाहिजे तसे पाडता येतीलच, शिवाय अन्नधान्य आणि अन्नपदार्थांच्या विक्री किंमतीही वाट्टेल तशा वाढवता येतील. यातून भारतीय जनतेवर एक प्रकारची 'अन्न गुलामगिरी' लादली जाईल.

✻✻✻

---

**यंदा सणासुदीच्या हंगामाच्या तोंडावर बाजारपेठेत फारसा उत्साह पहायला मिळणार नाही, असा अंदाज होता. मात्र भारतीय ग्राहक तो खोटा ठरवत आहेत. ऑनलाईन बाजारपेठ किंवा शेअर बाजारामध्ये थोडी बरकत पहायला मिळू लागली आहे.**

# उत्साह शेअर बाजारातला आणि खरेदीतला




**महेश देशपांडे**

सध्या शेअर बाजारात विशेस उत्साहाचं वातावरण पहायला मिळत आहे. पुढील तीन वर्षांमध्ये सूचीबद्ध (लिस्टेड) कंपन्यांच्या भांडवलाचे मूल्य ( मार्केट कॅप ) तीन लाख सत्तर हजार कोटी रुपये होण्याची शक्यता आहे. तीन वर्षांमध्ये मार्केट कॅप एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त वाढेल. 'गोल्डमन सॅक्स' या आघाडीच्या आर्थिक निरिक्षक संस्थेने ही अपेक्षा व्यक्त केली आहे. या ब्रोकरेज हाऊसने म्हटलं आहे की शेअर बाजारात सकारात्मक भावना पहायला मिळत आहे. परदेशी गुंतवणूकदार गुंतवणूक करत आहेत असे दिसते.

मुंबई शेअर बाजाराने मार्केट कॅपमध्ये फ्रान्सला मागे टाकत सहाव्या स्थानावर झेप घेतली आहे. या वर्षाच्या अखेरीस ४० आयपीओ अपेक्षित आहेत. यापैकी ऑक्टोबर आणि नोव्हेंबरमध्ये ३० हून अधिक आयपीओ येऊ शकतात. झोमॅटोसारखे स्टार्टअप्स मार्केट कॅपमध्ये अधिक योगदान देतील.पेटीएमदेखील या दिवाळीला लिस्टेड होईल. ओयो, ओला आणि फ्लिपकार्टसारखे स्टार्टअप्सही लिस्टेड होतील.

या वर्षी देशात २७ स्टार्टअप्स युनिकॉर्न बनले आहेत. युनिकॉर्न म्हणजे एक अब्ज डॉलर्सचे मूल्यांकन असलेल्या संस्था. या आर्थिक वर्षात भारतीय शेअर बाजार ३० टक्क्यांच्या जवळपास वाढला आहे. ही जगातली सर्वोत्तम कामगिरी आहे. येऊ घातलेला सर्वात मोठा आयपीओ आयुर्विमा महामंडळाचा( एलआयसी) आहे. नजीकच्या काळात त्याचा विक्रम मोडणंही कठीण होईल. हा आयपीओ एकाच फटक्यात मार्केट कॅप १०-१२ लाख कोटी रुपयांनी वाढवेल.

जुलैमध्ये मार्केट कॅपमध्ये सात लाख कोटी, ऑगस्टमध्ये १३ लाख कोटी आणि या महिन्यात १० लाख कोटी रुपये होता. बँक ऑफ अमेरिकेने एका अहवालात म्हटलं आहे की या वर्षी संपूर्ण जगाच्या बाजारात १०४८ अब्ज डॉलर्सची रक्कम आली आहे. आकडेवारी दर्शवते की भारतीय बाजारात तेजीदरम्यान, परदेशी गुंतवणूकदारांचा वाटा ऑगस्टपर्यंत ६३० अब्ज रुपये होता. ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये बाजारात सर्वात मोठी तेजी दिसून आली आणि अनेक नवीन विक्रम प्रस्थापित झाले. बाजार सध्या तेजीत आहे, पण तो खाली येऊ शकतो. बाजाराचं मूल्यांकन खूप जास्त आहे. दुसरीकडे काही ब्रोकरेज हाऊसचा विश्वास आहेकी सेन्सेक्स डिसेंबरपर्यंत ७० हजारांचा टप्पा ओलांडू शकतो. याचं कारण सणासुदीच्या हंगामाव्यतिरिक्त, मोठे आयपीओदेखील बाजारात दाखल होतील.

शेअर बाजार तेजीत येत असताना ऑनलाईन खरेदीची बाजारपेठही उत्साहात दिसत आहे. या वर्षातला सर्वात मोठा ऑनलाईन शॉपिंग महोत्सव अमेझॉन आणि फ्लिपकार्टवर सुरू होत आहे. ॲमेझॉनने याला 'द ग्रेट इंडियन फेस्टिव्हल सेल' तर 'फ्लिपकार्ट'ने 'द बिग बिलियन डेज सेल' असं नाव दिलं आहे. दोन्हींची विक्री ३ ऑक्टोबरपासून सुरू झाली आहे. कोणत्या प्लॅटफॉर्मवर खरेदी करणं अधिक फायदेशीर ठरेल आणि एवढ्या स्वस्तात वस्तू उपलब्ध कशा होतात, याबद्दल विशेष कुतुहल पहायला मिळत आहे.

फ्लिपकार्टच्या सेलमधली विक्री १० ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार ॲक्सिस बँक तसंच आयसीआयसीआय बँकेच्या ग्राहकांना १० टक्के त्वरित सूट दिली जाईल. पेटीएम ग्राहकांना कॅशबॅक मिळणार आहे. सर्व फायदे वेबसाइट आणि ॲप दोन्हीवर उपलब्ध असतील. याशिवाय नो कॉस्ट ईएमआय, एक्सचेंज ऑफरसारखे फायदेही दिले जातील. दिवसातून तीन वेळा स्वस्तात उत्पादनं खरेदी करण्याची संधी मिळेल. यासह, कंपनी 'बाय मोअर, सेव्ह मोअर' ची संधी देते. म्हणजेच, दोन उत्पादनं घेतल्यास पाच टक्के सूट तर पाच किंवा दहा उत्पादनं घेतल्यास दहा टक्के सूट मिळणार आहे.



अमेझॉनवर सुरू होणारा 'ग्रेट इंडियन फेस्टिव्हल' सेल तीन ते दहा ऑक्टोबरदरम्यान चालणार आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार एचडीएफसी बँकेच्या ग्राहकांना खरेदीवर दहा टक्क्यांची त्वरित सूट दिली जाईल. याशिवाय नो कॉस्ट ईएमआय, एक्सचेंज ऑफरसारखे फायदेही दिले जातील. ॲमेझॉन प्राइम मेंबरशिप असणाऱ्या ग्राहकांना या सेलमध्येइतरांच्या आधी प्राधान्याने खरेदी करता येईल. ॲमेझॉनच्या मते या काळात ग्राहक पाच हजार रुपयांपर्यंत बचत करू शकतील. ॲमेझॉन कूपन २० लाखांहून अधिक उत्पादनांवर उपलब्ध असतील. या विक्रीदरम्यान अनेक कंपन्या नवी उत्पादनंही लाँच करतील. ॲमेझॉन पे आणि आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट कार्डवर तीन टक्के रिवॉर्ड पॉइंट उपलब्ध असतील. बजाज फिनसर्व कार्डसह नो कॉस्ट ईएमआयवर उत्पादनं खरेदी करण्याची सुविधा आहे. २५ हजार रुपयांपर्यंत एक्सचेंज बोनसदेखील आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन आणि ऑफलाईन बाजारात अनेक ऑफर दिल्या जातात. या ऑफर्समध्ये फोन, इलेक्ट्रॉनिक्स, घरगुती उपकरणं, गॅझेट्स, ॲक्सेसरीज, फॅशन वेअरसह अनेक उत्पादनं समाविष्ट आहेत. मात्र ऑफलाईन खरेदी करणं चांगलं असल्याचा तज्ज्ञांचा सल्ला आहे.

दिल्ली यार्न मर्चंट असोसिएशन (डीवायएमए) शी संबंधित रतन कुमार जैन म्हणतात की बाजारातून खरेदी करण्यासाठी ग्राहकांना अनेक दुकानांमध्ये भटकंती करावी लागते. त्यासाठी वेळ आणि पेट्रोल दोन्ही खर्च होतो. ऑनलाइन शॉपिंगमुळे हे काम काही मिनिटांमध्ये पार पडतं. मात्र बाजारातून प्रत्यक्ष खरेदी करण्याचा मोठा फायदा म्हणजे ग्राहक विकत घेत असलेलं उत्पादन त्याच्या समोर असतं. कापड खरेदी करताना, तो त्याची गुणवत्ता आणि आकार दोन्ही पाहण्यास सक्षम असतो. कपड्यांची ट्रायल घेता येते. ऑनलाईन खरेदीमध्ये असं होत नाही. बरीच ऑनलाइन उत्पादनं दुकानांमध्ये उपलब्ध नसतात. यामुळे, बहुतेक ग्राहक ऑनलाइन खरेदीकडे वळतात.

मध्य प्रदेश इलेक्ट्रिक मर्चंट्स अँड काँट्रॅक्टर्स असोसिएशनशी संबंधित ओमप्रकाश गुप्ता सांगतात की ऑफलाईन बाजारातून एखादं उत्पादन खरेदी करताना दुकानदारावर त्या उत्पादनाची जबाबदारी असते. त्यात काही दोष किंवा इतर कमतरता असेल तर ती दूर केली जाते. ऑनलाईन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना अशा प्रकारची सेवा मिळत नाही. ऑनलाइन कमी किंमत निवडक उत्पादनांवर असू शकते, इतर उत्पादनांची किंमत नेहमीच जास्त असते; मात्र अनेक वेळा ग्राहक बाजारात किंमत जाणून घेण्याचा प्रयत्नही करत नाहीत. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनं विकणाऱ्या मंगलम इलेक्ट्रॉनिक्सचे सन्मान बन्सल म्हणतात की ऑनलाइन शॉपिंगद्वारे खरेदी केलेल्या उत्पादनाची खात्री मिळतेच असं नाही. ही मूळ वस्तूची पहिली प्रत किंवा ग्रे मार्केट उत्पादनही असू शकतं. ऑनलाईन उत्पादन योग्य आहे का हे तपासण्यास ग्राहक सक्षम नाहीत. अनेक वेळा ग्राहकाला जुनं किंवा सेकंड हँड उत्पादन विकलं जातं. त्याच्या सुरक्षिततेची खात्री नसते. ते टिकेल, याची हमी देता येत नाही.

✻✻✻

# 'क्रूझ'वरची नशेबाजी

**मुंबई जवळ समुद्रात आलिशान बोटी वरील नशेबाजी प्रकरणाने अवघ्या चित्रसृष्टीची झोप उडवली. यातून नैतिकतेबरोबरच गुन्हेगारी वृत्तीचाही प्रश्न उपस्थित झाला. समाजासाठी, चित्रसृष्टीसाठी हा विषय अनपेक्षित नाही. मात्र यातून संबंधित तसंच उच्चभ्रू समाज धडा घ्यायला तयार नाही, हेच खरं.**

**अजय तिवारी**







काही गोष्टी गांभीर्यानं घ्यायच्या असतात, त्याचा विनोद करायला गेलं की अंगलट येतो. सुपरस्टार शाहरूख खान यांचा मुलगा आर्यन याच्याबाबतीत आता ते प्रत्यक्षात घडलं आहे.मुलगा आर्यनलाअटक झाल्यानंतर शाहरूखच्या २४ वर्षांपूर्वीच्या वक्तव्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. सिमी ग्रेवालच्या टॉक शोमध्ये शाहरुख पत्नी गौरी खानसोबत गेला होता. त्यावेळी त्याने गमतीत म्हटलं होतं की त्याच्या मुलाने त्या सर्व वाईट गोष्टी केल्या पाहिजेत, ज्या तो स्वत: तरुणपणी करू शकत नव्हता. शाहरुख म्हणाला होता, 'माझ्या मुलाने मुलींना डेट केलेलं मला पहायचं आहे, त्याने ड्रग्जचाही आनंद घ्यावा. तो एक वाईट मुलगा बनला पाहिजे आणि जर तो एका चांगल्या मुलासारखा दिसू लागला तर मी त्याला घराबाहेर फेकून देईन.' शाहरुखने विनोदी पद्धतीने सांगितलेली ही बाब आता सोशल मीडियामध्ये व्हायरल झाली आहे.

आलिशान बोटी(क्रूझ)वरील नशेबाजांच्या बेकायदेशीर पार्टीत आर्यन पकडला गेल्यानं बातमीचा विषय झाला असला तरी यापूर्वी अशी बऱ्याच बापांची मुलं अमली पदार्थांच्या आहारी गेल्याची उदाहरणं आहेत. मागे पुण्यातही ज्येष्ठ पोलिस अधिकारी विश्वासराव नांगरे पाटील यांनी रेव्ह पार्टीचा प्रकार उघडकीस आणला होता. त्यातही एका मराठी अभिनेत्रीसह बड्या धेंडांची मुलं आढळली होती. ताज्या प्रकरणाने धनाढ्यांच्या आयुष्यात ठाण मांडून बसलेल्या बेपर्वाईची, बेफिकिरीची आणि रगेल वृत्तीची नव्याने साक्ष निघाली आहे.

अमली पदार्थ नियंत्रण विभागाने आर्यन खानचा फोन जप्त केला. क्रूज ड्रग्ज पार्टीमध्ये सहभागी असल्याबद्दल एनसीबीने आर्यनसह एकूण आठजणांना ताब्यात घेतलं, त्यामध्ये तीन मुली आहेत. या प्रकरणात एनसीबीने शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान, अरबाज मर्चंट, मुनमुन धमीचा, नुपूर सारिका, इश्मीत सिंग, विक्रांत चोकर, गोमित चोप्रा, मोहक जसवाल यांची चौकशी केली होती. दिल्लीच्या एका बड्या उद्योगपतीची मुलगीही यात सामील असल्याचं सांगितलं गेलं.

मुंबईहून गोव्याला जाणाऱ्या क्रूझवर एनसीबीने घातलेल्या छाप्यामध्ये हशिश, एमडी, कोकेनची मोठी मात्रा सापडली.त्या आधी तीन दिवस एनसीबीला या पार्टीची माहिती मिळाली. या पार्टीत सामील होण्यासाठी ८० हजार ते पाच लाख रुपये आकारण्यात आल्याचं उघड झालं. या माहितीच्या आधारे, एनसीबीचे काही अधिकारी पार्टीत सामील होण्याच्या बहाण्याने क्रूझमध्ये दाखल झाले. पार्टीतलं दृश्य पाहिल्यानंतर या टीमने बाहेर बसलेल्या अधिकाऱ्यांना माहिती दिली. यानंतर एनसीबीच्या टीमने छापा घातला.
सूत्रांच्या माहितीनुसार, शाहरूख खान आपल्या आगामी 'पठाण' या चित्रपटाच्या चित्रणासाठी स्पेनला रवाना होणार होता. शाहरूख आणि दीपिका पादुकोण यांच्यावर एक गाणं चित्रीत होणार होतं; परंतु आर्यन खानला झालेल्या अटकेमुळे शाहरूख खान या प्रकरणाकडे ओढला गेला. आर्यनचा मित्र अरबाज सेठ मर्चंट याचं अमली पदार्थांशी जास्त जवळचं नातं असल्याचं बोललं जातं. आर्यन खान आपलं आयुष्य जास्तीत जास्त खासगी राखणं पसंत करतो. चित्रपटसृष्टीत होणाऱ्या मोठ्या पार्ट्यांमध्ये आर्यनचा खूपच कमी सहभाग असतो. त्यामुळे क्रूझवर सुरू असलेल्या पार्टीत आर्यन खानचं नाव समोर आल्यावर बॉलिवूडसह त्याचे मित्रही चकित झाले . संबंधितांनी ड्रग्जचं सेवन सुरू केल्यानंतर एनसीबीच्या पथकाने या सर्वांना मुद्देमालासह अटक केली.

ही क्रूझ काही दिवसांपूर्वीच सुरू झाली होती. त्यातून बरेचजण ये जा करत असत किंवा त्यावर अशा पार्ट्या नियमितपणे व्हायच्या अशी चर्चा ऐकायला मिळत नाही. त्याचप्रमाने आर्यन खानचा या प्रकरणात थेट समावेश होता की नाही, त्याने ड्रग्ज खरेदी केले होते का नाही यासंदर्भात स्पष्ट माहिती मिळत नाही. न्यायालयात हे प्रकरण तडीस निघेलच.

मोठ्या,वलयांकित कलाकारांची मुलं-मुली ड्रग्ज केसमध्ये अडकण्याची ही पहिलीच वेळ नाही. बॉलीवूडच्या अनेक पार्ट्यांमध्ये ड्रग्जसेवनाचे प्रकार घडत आले असून त्याबद्दलची माहिती दबक्या स्वरात ऐकायला मिळाली आहे. अनेक वेळा अशी प्रकरणं समोरही आली; मात्र तपासातून फार काहीच निष्पन्न झालं नाही. चित्रपटसृष्टीतल्या काही मंडळींना ड्रग्ज सेवनासाठी तुरुंगात जावं लागलं आहे तर काहींना ड्रग्जच्या विळख्यातून सुटण्यासाठी रिहॅबिलिटेशन सेंटरचा आधार घ्यावा लागला आहे.

मोठ्या कलाकारांच्या मुलांचा विषय निघतो तेव्हा सुनील दत्त यांचा मुलगा संजय दत्तचा उल्लेख येतो. आई नर्गिस दत्त यांचं निधन झाल्यानंतर संजयचं ड्रग्जसेवनाचं प्रमाण वाढलं होतं. ड्रग्जच्या विळख्यातून सुटका व्हावी, यासाठी सुनील दत्त यांनी संजयला अमेरिकेतल्या रिहॅबिलिटेशन सेंटरमध्ये पाठवलं होतं. तिथून ठीक होऊन परतल्यानंतर संजयने चित्रपटांमध्ये पुनरागमन केलं. अभिनेत फिरोझ खान यांचा मुलगा फरदीन खानला २००१ मध्ये मुंबई पोलिसांनी ड्रग्जसह पकडलं होतं. यातून सुटका होण्यासाठी त्याला प्रदीर्घ अशी कायदेशीर लढाई लढावी लागली. रिहॅबिलेशन सेंटरच्या माध्यमातून उपचार घेतल्यानंतर त्याने ड्रग्ज घेतल्याची कबुली दिली होती.

स्मिता पाटील आणि राज बब्बर यांचा मुलगा प्रतीक बब्बरने ड्रग्जच्या सवयीबद्दल सांगितलं होतं. बिघडणारी अवस्था पाहून त्याला रिहॅब सेंटरमध्ये नेण्यात आलं. तिथे उपचार झाल्यानंतर त्याची ड्रग्जची सवय सुटली. प्रतीक आता सुरळीत आयुष्य जगत आहे आणि त्याने चित्रपटांमध्येही पुनरागमन केलं आहे. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रमोद महाजन यांचा मुलगा राहुल महाजन ड्रग्जप्रकरणी वादाच्या भोवऱ्यात सापडला होता. त्यासाठी त्याला तुरुंगातही जावं लागलं. ड्रग्जच्या अतिसेवनामुळे त्याची प्रकृती ढासळली तेव्हा त्याला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आलं. राहुलने सर्व आरोप फेटाळले होते. अभिनेता सैफ अली खानची मुलगी सारा अली खान आणि खलनायकाच्या भूमिकांसाठी प्रसिद्ध असलेले शक्ती कपूर यांची मुलगी श्रद्धा कपूर यांचीही नावं ड्रग्ज सेवनाप्रकरणी समोर आली होती. सुशांत राजपूतच्या कथित ड्रग्जसेवनाच्या व्यसनाशी संबंधित प्रकरणांची एनसीबीकडून चौकशी सुरू असताना सारा अली खान, श्रद्धा कपूर यांच्यासह रकुलप्रीतसिंह आणि दीपिका पदुकोणचं नाव समोर आलं होतं.

ताज्या प्रकरणात क्रूझवर सहभागी लोकांनी आपल्या पँटच्या शिलाईमध्ये, महिलांच्या पर्सच्या हँडलमध्ये, अंडवेअरच्या शिलाईच्या भागात आणि कॉलरच्या शिलाईत ड्रग्ज लपवल्याचं समोर आलं आहे. दोन हजार प्रवासी क्षमता असलेल्या या क्रूझ मध्ये एक हजारांहून कमी लोक प्रवास करत होते. पार्टीचं निमंत्रण इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडियावरून देण्यात आलं होतं. त्यासाठी काही लोकांना विशेष किट भेट देऊन आमंत्रित करण्यात आलं होतं. या क्रूझ शिपवर आलेले बहुतांश लोक दिल्लीतले होते. विमानातून ते मुंबईला आले आणि नंतर क्रूझवर गेले होते. या प्रकरणाचा छडा लवकरच लागेल पण, त्याची कुप्रसिध्दी लक्षात घेता चित्रसृष्टी योग्य तो धडा घेईल, अशी अपेक्षा आहे.

***



# आगामी ग्रहयोग

* शिरीष कुलकर्णी *

## १० ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर २०२१

### सुविचारांचे, संस्कारांचे सोने

आपले बहुतेक सण दुष्टांचा नाश आणि सद्गुणांचा, सत्प्रवृत्तींचा विजय या संकल्पनेवरच आधारलेले आहेत. काळानुसार काही नव्या प्रथा त्या समारंभांना जोडल्या जातात तेव्हा त्या सणांचे मूल्य अधिक वाढते. आश्विन महिना हा मोठ्या सणांचा महिना आहे. महिन्याची सुरुवातच नवरात्रीच्या उत्सवाने होते तर महिन्याचा शेवट दिव्यांच्या मोठ्या सणाने होतो. देवी दुर्गेने केलेल्या महिषासुराच्या वधाच्या आनंदोत्सवाची सांगता होत असतानाच येणाऱ्या विजयादशमीला देखील रामाने रावणाचा केलेला पराभव, पांडवांनी केलेला कौरवांचा पराभव अशा आणखी काही घटनांचे संदर्भ जोडले गेले. म्हणून आश्विन शुक्ल दशमी ही विजयांची दशमी म्हणून साडेतीन मुहूर्तात अंतर्भूत झाली. येत्या दि.१५ रोजीच्या विजयादशमीला म्हणजेच दसऱ्याच्या दिवशी वाटल्या जाणाऱ्या आपट्याच्या पानांच्या सांकेतिक सोन्याला देखील अशा अनेक शुभ घटनांच्या आख्यायिका जोडल्या गेल्या आहेत. बदलत्या काळाप्रमाणे या दसऱ्याच्या सोन्याला सोनेरी विचारांचे स्वरूप यायला हवे. आत्मकेंद्रित होत चाललेल्या मानवी मनात आता सार्वजनिक हिताची मूल्ये देखील जोडली जावीत. आपट्यांच्या पानासोबत सामाजिक संस्कारांची देखील देवाण घेवाण व्हावी. तेव्हाच विजयांची ही दशमी अधिक संस्कारी आणि अधिक गौरवशाली होईल.

### मेष-वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी

सप्ताहाचा आरंभ नीरस आणि उदासवाणा राहील. आरोग्य नरमगरम राहील. जुन्या व्याधी असणाऱ्यांना व्याधी नियंत्रणात ठेवणे कठीण जाईल. नोकरी आणि व्यवसायात प्रभाव उत्तम राहिला तरी मेहनत कमी होणार नाही. बुद्धी चातुर्याने कूट समस्यांची उकल कराल. तुमचे ज्ञान आणि कौशल्य वादातीत राहील. उत्तरार्धात वरिष्ठांचा पाठिंबा लाभला तरी अपेक्षित घडामोडी घडणे कठीण राहील. शनी नवे अडसर उभे करेल तर गुरु हितसंबंधांना बाधा आणेल. धाडसाने एखादी वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी पार पडाल. सप्ताहाच्या शेवटी अविचारातून भावनिक नुकसान होण्याची शक्यता आहे.

### वृषभ-आशावाद जागृत ठेवा

कौटुंबिक जीवनांत सुखाच्या आणि आनंदाच्या प्रसंगांचा अनुभव घेत राहाल. अर्थार्जनात आणि आर्थिक घडामोडीत अनुकूलता राहील. प्रगती आणि उद्दिष्टपूर्तीबाबत नोकरदारांचा अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे. सोमवार निरुत्साही राहील. नसता विश्वास बाळगून किंवा कोणाला गृहीत धरून घेतलेले निर्णय अंती अविचारी ठरतील. अंदाज चुकीचे ठरण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात तुम्ही काटेकोर राहिलात तरी व्यावसायिक जीवनातील नियतीचे फासे तुमच्या बाजूने पडणार नाहीत. गुरु भ्रमण आशादायी राहील. सप्ताहाचा शेवट औद्योगिक तडजोडींचा आणि माघार घ्यायला लावणारा आहे.

### मिथुन-कौटुंबिक सुसंवाद

नोकरीत आपले वजन टिकवून ठेवाल. कौटुंबिक जीवनात सुखप्राप्ती होईल आणि सुसंवाद घडतील. व्यावसायिक जीवन स्थिर आणि आशादायी राहील. चतुर्थातील मंगळ घरगुती विरोधातून वाद वाढवेल. वास्तू आणि वाहन यांचे खर्च वाढतील. घरातील ज्येष्ठांना उदरपीडा त्रास देईल. गुरुवार नैराश्य आणणारा असला तरी बौद्धिक क्षेत्रातील घडामोडी तुमच्या नियंत्रणात राहातील. अष्टम स्थानातील शनी आणि गुरू संघर्षाची तीव्रता वाढवतील. उत्तरार्धात आरोग्य सांभाळा. काही जणांना उष्णतेचे त्रास होण्याची शक्यता आहे. सप्ताहाचा शेवट कौटुंबिक बेबनावाचा.

### कर्क-सार्वजनिक क्षेत्रात वर्चस्व

भरकटणाऱ्या विचारांना स्थिरता लाभणे कठीण वाटेल. प्रेमात आणि सहजीवनात गैरसमज वाढतील. रवि आणि मंगळ व्यावसायिक जीवन कर्तृत्ववान बनवणारे असले तरी तुमच्या ठायी समजूतदारपणाचा अभाव राहील. गुरुवार पत्नीच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याचा आणि क्षुल्लक घटनातून होणारे गैरसमज टाळण्याचा आहे. उत्तरार्धातील रवी आणि गुरू यांचा शुभयोग नोकरदारांचा मान वाढवणारा, अधिकार देणारा आणि अधिकाऱ्यांच्या ओळखीतून अप्रत्यक्ष लाभ होण्याचा आहे. राजकारण आणि सार्वजनिक क्षेत्रात तुमचे वर्चस्व राहील. सप्ताहाच्या शेवटी कौटुंबिक संमेलनाचा आनंद घ्याल.

### सिंह-नोकरीत अपेक्षित घटना

कौटुंबिक जीवन तणावाचे राहील. मतभेद मिटवण्यासाठी मोकळेपणाने चर्चा करा. कौटुंबिक किंवा आर्थिक निर्णय एकतर्फी घेतल्याने गैरसमज वाढू शकतात. सरकारी व्यवहारात किंवा सरकारी नियमांमुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. बुधवार नोकरदारांना सहजतेचा आणि अपेक्षित घटना घडविणारा आहे तर गुरुवारी शांतचित्ताने आणि दूरदृष्टीने निर्णय घेऊन समस्यांचे निवारण करू शकाल. उत्तरार्धात वरिष्ठांचा पाठिंबा मिळवणे कठीण जाईल. नियम पाळून निरोगी राहाण्याचा प्रयत्न करा. सप्ताहाचा शेवट भावनाप्रभावातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष नुकसान करणारा आहे.

### कन्या- विचारांची दिशा बदलेल

सप्ताहाचा प्रारंभ जरी उत्साहाने कार्यरत ठेवणारा असला तरी राशीतील मंगळ, रवी आणि बुध हे उतावळेपणा करणारे, आणि अविचारी कृतीला प्रोत्साहन देणारे आहेत. वर्तणुकीतील अनियमितपणाने आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. मतभेद आणि कलह मनस्तापाचे कारण बनतील. स्वतःची चूक नसताना नोकरदारांना मनाविरुद्ध तडजोडी कराव्या लागतील. कोर्ट कचेऱ्यांच्या कामात माघार घ्यावी लागण्याची शक्यता आहे. मानसिक चंचलता आणि अतिचिकित्सांमुळे अनुकूल घटनांना देखील विलंब होईल. सप्ताहांती विचारवंतांच्या सहवासाने तुमच्या विचारांची दिशा बदलेल.

### तूळ-लहरीपणा टाळा

सप्ताहाचा प्रारंभ आर्थिक प्रगतीचे संकेत देणारा असला तरी अनाठायी खर्चाने स्थैर्य लाभणे कठीण होणार आहे. प्रतिष्ठेच्या प्रश्नांवरून व्यावसायिक क्षेत्रात वादाचे प्रसंग येऊ शकतात. लहरीपणाने केलेली कृती तुम्हाला अडचणीत आणू शकते. नोकरदारांना मानहानीकारक प्रसंगांना सामोरे जावे लागू शकते. चतुर्थातील शनी आणि गुरू घरातील वातावरण असमाधानी ठेवतील. छोटे अपेक्षाभंग नैराश्य आणण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात एखाद्या आप्तेष्टाचा वियोग क्लेशदायक होईल. पायाची इजा टाळण्यासाठी हालचाली नियंत्रित ठेवा. सप्ताहाच्या शेवटी काहीजणांना अग्निभय राहील.

### वृश्चिक-नशिबाची साथ लाभेल

उंचावलेली ऊर्जा आणि मनापासून केलेले प्रयत्न यांना नशिबाची साथ लाभेल. लाभ स्थानातील मंगळ आणि बुध व्यावसायिक इच्छा पूर्ण करतील. आर्थिक प्रगतीसोबत पदलाभाचा आनंद देतील. स्थावर व्यवहारासाठी अत्यंत अनुकूल काळ आहे. बुधवारी आणि गुरुवारी नोकरदारांना सुवार्ता लाभ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक आघाडीवर कुटुंब सुखाचा आनंद उंची खरेदीसह घेता येणार आहे. उत्तरार्धात सरकार दरबारी रेंगाळलेले काम मार्गी लागेल. प्रवास दगदगीचे झाले तरी प्रवासाची उद्दिष्टे साध्य होतील. सप्ताहाच्या शेवटी एखाद्या भावंडाला शारीरिक अपाय होण्याची शक्यता आहे.

### धनु-नोकरीत कौतुक सोहळा

खर्च वाढले तरी चिंता करण्याचे कारण नाही. आकर्षक खरेदीचा आनंद घ्याल. नोकरीत कोणाच्या दबावाखाली येऊन कोणाच्या नसत्या कुरापती काढू नका. आपापल्या क्षेत्रात तुमच्या धारदार बुद्धीची प्रचीती येईल. बुधवार आणि गुरुवार आर्थिक बळकटी देणारे असले तरी कौटुंबिक असमाधान वाढवणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. उत्तरार्ध अधिकार प्राप्तीचा तसेच एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण यश प्राप्तीचा आहे. सरकारी नोकरांचा कौतुक सोहळा पार पडेल. शुक्रवार नोकरदारांची अपेक्षापूर्ती करणारा तर व्यापारात उलाढालीचा आलेख उंचावणारा आहे. सप्ताहाचा शेवट ऐहिक सुखोपभोगाचा.

### मकर-जुन्या मित्रांच्या भेटी

सप्ताहाचा आरंभ लाभदायक आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष लाभ उत्साह वाढवतील. जुन्या मित्रांच्या भेटी आनंद देतील. मंगळ आणि बुध नोकरी आणि व्यवसायातील अडथळ्यांची शर्यत चालूच ठेवतील. अनावश्यक चर्चा आणि वादविवाद भविष्यात होणारे गैरसमज टाळू शकतात. कोणत्याही क्षेत्रात एकत्र काम करत असाल तर मन मोठे ठेवा. ईर्षेने कोणतेही पाऊल उचलणे त्रासदायक ठरू शकते. जवळच्या व्यक्तीचा वियोग किंवा जवळच्या नात्यातील दुरावा सहन करावा लागण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात एखाद्या अपयशाची धास्ती वाटत राहील. सप्ताहाच्या शेवटी मानसिक संतुलन टिकवा.

### कुंभ-व्यावसायिक सहजता

सप्ताहाच्या प्रारंभी औद्योगिक जीवनात सहजता राहिली तरी अष्टम स्थानातील मंगळ एखादी कृती असूयेतून करायला लावण्याची शक्यता आहे. दैनंदिन जीवनातील विशेष प्रसंगात बुद्धी चातुर्याचा प्रत्यय येईल. गुरुवारी अष्टम स्थानातील रवी पत्नीला आरोग्यविषयक त्रास निर्माण करू शकतो तर वक्री शनी अनाठायी खर्चातून मनस्ताप वाढवू शकतो. व्यापाऱ्यांनी उधारीवर आणि भांडवलाच्या विनियोगावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. उत्तरार्धात एखाद्या नातेवाईकाकडून मानसिक क्लेश देणारी कृती घडू शकते. सप्ताहाच्या शेवटी दुखापतीची शक्यता आहे.

### मीन- आर्थिक स्थैर्य

सप्ताहाच्या प्रारंभी सरकारी नियमांचे उल्लंघन न होण्याची खबरदारी घ्या. काही जणांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल तर काही जणांना उदरपीडेचा त्रास होण्याची शक्यता आहे. मंगळवार कौटुंबिक कलहाचा राहील. पती-पत्नीतील मतभेदांना प्रतिष्ठेचे स्वरूप येईल. भागीदारी स्वरूपातील छोटे व्यवसाय गैरसमजांच्या आणि तक्रारींच्या भोवऱ्यात फिरत राहतील. उत्तरार्ध आर्थिक प्रगतीतून स्थैर्याकडे वाटचाल करेल. लाभातील गुरू नोकरदारांची प्रतिष्ठावृद्धी करेल. कौटुंबिक जीवनात शुभ घडामोडींचे संकेत लाभतील. सप्ताहाचा शेवट भावनोद्रेकाचा राहील.

***

Regd.No. PCW/002/2021-2023-S.P.College Post-RNI No. 1755/1957

# आदिशक्तीच्या कथा

पुराण कथा– अर्थ नवा

डॉ. अंबरीष खरे

**शारदीय नवरात्रात देवीच्या विविध रूपांच्या उपासनेची महती आहे.'दुर्गा सप्तशती' या ग्रंथाचा पाठ या काळात केला जातो. या ग्रंथा विषयी....**



मार्कंडेय पुराणामध्ये येणारे तेरा अध्याय शक्तीच्या उपासनेकरिता अतिशय महत्त्वाचे मानले जातात. त्यामध्ये एकूण सातशे श्लोक असल्याने ते दुर्गासप्तशती या नावाने प्रसिद्ध आहेत.

या सप्तशतीमध्ये महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या तीन देवतांनी असुरांचे निर्दालन केल्याच्या कथा आहेत. साधारणपणे कालीचा संबंध शिवाशी, लक्ष्मीचा विष्णूशी आणि सरस्वतीचा ब्रह्मदेवाशी जोडला जातो. परंतु सप्तशतीमधील देवता कोणत्या ना कोणत्या प्रकारे विष्णूशी अवश्यंभावी जोडल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, महाकालीला विष्णूची योगनिद्रा मानले आहे. महिषमर्दिनी तर महालक्ष्मी म्हणूनच ओळखली जाते. महासरस्वती या तिसऱ्या देवतेच्या कथेनंतर सर्व देव तिची नारायणी म्हणून स्तुती करतात. यावरून असे दिसते की देवीमाहात्म्य वैष्णव परंपरेशी नाते सांगणारे आहे.

देवीमाहात्म्याच्या प्रथम चरितात मार्कण्डेयांच्या संवादामध्ये सावर्णी मनूचा उल्लेख येतो. सुरथ राजावर परचक्र आले असता तो एकाकी अवस्थेत आपल्या घोड्यावर बसून वनामध्ये जातो. मेधा (संस्कृत मेधस्) नावाच्या एका मुनींच्या आश्रमामध्ये पोहोचून तेथे काही दिवस मुक्काम केला असता राजाच्या मनात सतत आपल्या राज्याविषयीच विचार येत असतात. आपले अधिकारी प्रजेची नाट काळजी घेतील का, परक्या राजाच्या हाताखाली माझा प्रधान, माझे नोकरचाकर कसे बरे काम करीत असतील, वायफळ खर्च करून माझा खजिना ते रिकामा तर करून टाकणार नाहीत ना इत्यादी असंख्य चिंता त्याचे मन पोखरत असतात. त्याच दरम्यान मेधा मुनींच्या आश्रमातील समाधी नावाच्या एका वैश्याशी राजाची गाठ पडते. या वैश्याचे घरदार आणि सर्व संपत्ती लाटून त्याच्या बायका–मुलांनीच त्याला घराबाहेर काढलेले असते. आश्रमात राहात असता तोही सतत माझी मुले आता तरी सुखात असतील ना, बायका खुशीत दिवस घालवतील ना, आता ती सर्व मंडळी सदाचाराचे पालन करतात की अजूनही दुर्वर्तनीच आहेत, इत्यादी विचारांनी चिंताक्रान्त झाला आहे. राजा त्याला विचारतो की, ज्या कुटुंबियांनी तुलाच घराबाहेर काढले, त्यांची काळजी करायची तुला गरजच काय? त्यावर तो वैश्य म्हणतो की, मी माझ्या मनाला खूप समजावले, परंतु मनात सतत घरच्यांचेच विचार येत राहतात.

शेवटी एकदा ते दोघे मेधा मुनींना भेटले असता राजा आपली शंका त्यांना विचारतो. तो म्हणतो मी माझ्या गेलेल्या राज्याची काळजी इथे आश्रमात राहूनही अखंडपणे करीत आहे. या वैश्याची कथाही माझ्यासारखीच आहे. तोही जी मंडळी त्याच्याशी वाईट वागली, त्यांच्याच चिंतेत सतत व्यग्र असतो. असे आमच्या बाबत का घडते आहे?

मेधा त्यावर म्हणतात, तुम्हा दोघांची स्थिती त्या पक्ष्यांसारखी झालेली आहे जे स्वतः भुकेने व्याकूळ झाले असूनही आपल्या पिलांच्या तोंडात घास भरवितात. महामायेची मोह नावाची शक्ती अत्यंत अद्भुत आहे. त्या मोहाच्या तावडीत सापडलेल्याची काय गत होईल ते सांगता येत नाही. यावर राजा आणि वैश्य महामायेविषयी अधिक माहिती जाणून घेण्याची इच्छा प्रकट करतात. त्यावर मेधा म्हणतात, भगवान विष्णूची शक्ती असणारी महामाया हे सर्व विश्व चालवते. ही महामाया जरी मूलतः अव्यक्त स्वरूपात असली, तरी देवतांच्या साहाय्यासाठी ती अनेकवार प्रकट होते. देवीमाहात्म्यात या तिच्या अनेक प्रकटनांपैकी पहिले अगदी थोडक्यात वर्णन केले आहे. शेषावर शयन करणाऱ्या विष्णूच्या कानातील मळापासून उत्पन्न झालेले मधू आणि कैटभ हे दोन असुर एकदा ब्रह्मदेवालाच ठार करण्यास उद्युक्त झाले. त्यावेळी ब्रह्मदेवाने विष्णूच्या डोळ्यांत घर करून असणाऱ्या (हरिनेत्रकृतालया) योगनिद्रेची स्तुती केली. त्या स्तुतीने प्रसन्न होऊन योगनिद्रेने विष्णूस जागे केले आणि मग विष्णूने मधुकैटभांना ठार मारले.

मध्यम चरित हे प्रथम चरितापेक्षा मोठे असून त्यामध्ये एकून तीन अध्याय (अध्याय २ ते ४) आहेत. महिष नावाच्या असुराच्या छत्राखाली एकजूट झालेल्या असुरांनी देवतांशी शंभर वर्षे युद्ध करून देवतांचा दारूण पराभव केला आणि त्यांना स्वर्गातून हाकलून दिले. पदच्युत झालेल्या देवांची पदे असुरांनी आपल्याकडेच घेतली. त्यांचा राजा अर्थातच महिषासुर होता. सर्व देवतांनी विष्णू आणि शिवाकडे धाव घेऊन कोसळलेल्या संकटाविषयी त्यांना सांगितले. विष्णू आणि शिव सर्व हकीगत ऐकून रागावले असता त्यांच्या मुखातून महान तेज बाहेर पडले आणि त्यामध्ये इतरही देवतांच्या तेजाची भर पडली. त्यातून एका स्त्रीची आकृती साकार झाली. तिला या सर्व देवतांनी वस्त्रालंकार, विविध आभूषणे आणि आपापली आयुधे दिली आणि युद्धाकरिता सज्ज केले.

दुसऱ्या अध्यायामध्ये पुढे देवीने असुरसैन्याचा, त्यातील प्रमुख असुरांचा आणि महिषाचा सेनापती असलेल्या चिक्षुराचा नाश कसा केला याची कथा येते तर तिसऱ्यात तिने महिषाला कसे ठार मारले ते सांगितले आहे. देवीने केलेला महिषाचा वध ही प्राचीन भारतातील असंख्य शिल्पकारांनी ठिकठिकाणच्या मंदिरांवर शिल्पांकित केलेली सुप्रसिद्ध कथा आहे. महिषाने विविध रूपे घेऊन देवीला त्रास देण्याचा प्रयत्न केला. अंततः तिने महिष रूपात त्याला पकडून त्रिशूळाचा वार केला असता एक शेवटचा प्रयत्न म्हणून तो मनुष्यरूप धारण करतो. महिषमुखातून मनुष्यदेह घेऊन बाहेर पडू पाहणाऱ्या असुराचा देवी शिरच्छेद करते, असे देवीमाहात्म्य सांगते. चौथ्या अध्यायात देवांनी केलेली महिषमर्दिनीची स्तुती आहे. शेवटी देवी त्यांना असे आश्वासन देते की जेव्हा जेव्हा आवश्यकता भासेल तेव्हा तेव्हा ती प्रकट होऊन असुरांविरुद्ध देवांना साहाय्य करेल.

देवीमाहात्म्याचे यापुढील सर्व अध्याय मिळून आकाराने सर्वात मोठे असलेले उत्तम चरित बनते. उत्तम चरितातील मुख्य कथा जरी शुंभ आणि निशुंभ या जुळ्या असुरांच्या वधाची असली तरी त्या अनुषंगाने देवीने इतरही अनेक असुरांचा संहार केला होता, ती सर्व वर्णने येथे सविस्तर सांगितली आहेत.

उत्तम चरिताच्या प्रारंभी (अध्याय ५) शुंभ आणि निशुंभ या दोघांनी देवांवर मिळवलेल्या विजयाची आणि त्यांना स्वर्गातून पदच्युत केल्याची कथा येते. देव यापूर्वी देवीने त्यांना दिलेल्या (असुरांच्या संहारासाठी प्रकट होऊन देवांना मदत करण्याच्या) आश्वासनाची आठवण काढून हिमालयात जातात आणि देवीची स्तुती करतात. या ठिकाणी देवांनी या विश्वामध्ये विविध रूपांत नांदणाऱ्या देवीच्या विविध स्वरूपांना 'या देवी सर्वभूतेषु' या शब्दांनी सुरू होणाऱ्या श्लोकांद्वारे नमन केले आहे. हे श्लोक सुप्रसिद्ध असून त्यांचे स्वतंत्रपणेही अनेकदा पठण केले जाते. देवांकडून स्तुती केली जात असता गंगेवर स्नानाकरिता आलेली पार्वती ही स्तुती ऐकून देवांना तुम्ही कोणाची स्तुती करता, असा प्रश्न करते. तेव्हाच तिच्या शरीरातून शिवा प्रकट होते आणि सांगते की हे देव माझीच स्तुती करत आहेत, मीच अंबिका आणि कौशिकी या नांवांनी ओळखली जाते. पार्वतीच्या शरीरातून शिवेचे निर्गमन झाल्यावर पार्वती काळी पडते आणि काळ्या वर्णामुळे काली या नावाने संबोधली जाऊ लागते.

इकडे अत्यंत सुस्वरूप अशा अम्बिकेच्या रूपाची महती चण्ड आणि मुण्ड या असुरांकरवी शुंभ आणि निशुंभ या असुरबंधूंच्या कानावर पडली. तिच्याशी लग्न करण्याच्या कामनेने शुंभाने दूतास रवाना केले, ज्याने अम्बिकेला शुंभाचा निरोप पोहोचवला. अम्बिकेने मात्र उलट असा निरोप पाठवला की माझ्याशी लग्न करण्याची इच्छा असणे ठीक आहे. परंतु माझी अशी प्रतिज्ञा आहे की जो मला युद्धात हरवेल, त्याच्याशीच मी लग्न करेन. त्यामुळे तुमच्या असुरराजालाही माझ्याशी युद्ध करूनच मला जिंकावे लागेल. त्यानंतरच ही इच्छा पूर्ण होऊ शकते.

सहाव्या अध्यायमध्ये दूताने अम्बिकेचा निरोप कथन केल्यावर पुढे काय घडले त्याचे वर्णन येते. असा निरोप ऐकून शुंभ साहजिकच चिडला आणि त्याने धूम्रलोचनाला ससैन्य जाऊन देवीस पराभूत करून खेचून आणण्यास फर्मावले. मात्र घडले उलटेच– देवीने धूम्रलोचनाचेच भस्म केले आणि तिच्या वाहनाने, सिंहाने, असुरसैन्याचा नाश केला. याने अधिक क्रोधित होऊन शुंभाने चण्ड आणि मुण्ड या असुरांना पाठवले. यावेळी कालीने त्या दोन्ही असुरांचा शिरच्छेद केला. देवीमाहात्म्य असे सांगते की कालीने चण्ड आणि मुण्ड या दोन असुरांना मारल्याने ती चामुण्डा या नावाने प्रसिद्ध झाली.

यानंतर सातव्या अध्यायामध्ये शुंभाने पाठवलेल्या महासैन्याशी देवीने दिलेल्या लढ्याचे विस्तृत वर्णन येते. अम्बिका, तिचा सिंह आणि काली त्वेषाने असुरसैन्याशी लढत असता, त्यांच्या मदतीस अन्य देवांच्या शक्ती धावून आल्या. हंसवाहक विमानात आसनस्थ असलेली ब्रह्माणी, बैलावर बसलेली त्रिशूलधारिणी माहेश्वरी, मोरावर स्वार झालेली कौमारी, गरुडारूढ वैष्णवी, वराहस्वरूप धारण केलेली वाराही, नारीदेह व सिंहमुख असणारी नारसिंही आणि गजारूढ वज्रहस्ता ऐन्द्री या त्या सात शक्ती होत. त्याच वेळी अम्बिकेच्या शरीरातून महाभयंकर अशी चण्डिका प्रकट झाली. तिने शिवास आपला दूत म्हणून शुंभ आणि निशुंभाची भेट घेऊन त्यांना पराभव मान्य करून निमूटपणे पाताळात निघून जा असा निरोप देण्यास सांगितले. देवी शिवाला आपला दूत करते, याद्वारे ती शिवाहून श्रेष्ठ असल्याचे सूचित केले गेले आहे. या प्रसंगामुळे तिला शिवदूती (शिव जिचा दूत आहे अशी) हे नामाभिधान प्राप्त झाले. अर्थातच शिवाचे हे दौत्य वाया गेले, हे सांगायला नकोच. असुरांतर्फे रक्तबीज लढण्याकरिता आला, ज्याचे रक्त जमिनीवर सांडले असता प्रत्येक थेंबातून पुन्हा पुन्हा असंख्य रक्तबीज तयार होत होते. देवीने कालीस आज्ञा केली की तिने तिचा अक्राळविक्राळ जबडा वासून मारलेल्या प्रत्येक रक्तबीजाचे सर्व रक्त प्राशन करावे, जेणेकरून ते जमिनीवर पडणार नाही आणि नव्याने रक्तबीजांची निर्मिती होणार नाही. त्यानुसार रक्तबीजाचे सर्व रक्त प्राशन करून कालीने रक्तबीजासही हतवीर्य केले, आणि शेवटी अम्बिकेकडून त्याचा नाश झाला.

निशुंभाने देवीवर केलेल्या स्वारीचे वर्णन नवव्या अध्यायात आहे. घनघोर युद्ध करून देवीने निशुंभाच्या हृदयावर शूलाघात केला असता त्यातून पुन्हा एक पुरुष प्रकट होतो, ज्याचा ती शिरच्छेद करते. दहाव्या अध्यायात निशुंभापाठोपाठ येणाऱ्या शुंभाशी देखील तिचे भयंकर युद्ध होते, जे केवळ पृथ्वीवरच नव्हे तर आकाशातही चालते. शेवटी देवी शुंभास जमिनीवर आपटते आणि तो उठला असता त्रिशूलाने ठार मारते. अकराव्या अध्यायामध्ये देवतांनी केलेली स्तुती आहे. या अध्यायाचे नाव नारायणीस्तुती असे आहे. या अध्यायाच्या अखेरीस देवीने देवांना पुन्हा आश्वस्त केले असून पुढे होऊ घातलेल्या आपल्या रक्तदन्तिका, शताक्षी, शाकम्भरी, दुर्गा, भीमा, भ्रामरी अशा स्वरूपांविषयी काही भविष्यकथन केले आहे.

बाराव्या अध्यायात देवीने देवांना आपली पूजा कशा प्रकारे केली जावी, याविषयी मार्गदर्शन केले आहे. तेराव्या अध्यायात देवीच्या या सर्व चरितांची जोडणी पुन्हा मूळच्या कथाबंधाशी करण्यात आली आहे. मेधा मुनींद्वारे सांगितली गेलेली ही तीन चरिते ऐकून राजा आणि वैश्य देवीची मातीची मूर्ती बनवून तिची उपासना करतात. तीन वर्षांनंतर त्यांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन चण्डिका प्रकट होते आणि दोघांनाही वर देते. वैश्याला त्याचे ममत्व सुटून मोक्षगती प्राप्त होते. सुरथ राजाला त्याचे राज्य प्राप्त होते, परंतु देवी त्याला असे सांगते की पुढील कल्पांती तोच मनू म्हणून जन्म घेणार असून त्यावेळी तो सावर्णी या नावाने प्रसिद्ध होईल. आपल्याला विविध पुराणांमध्ये एकूण चौदा मनूंचे वर्णन सापडते. त्यांपैकी सावर्णी हा आठवा मनू होय.



***

# छोट्या 'चिप'च्या टंचाईचा जगाला धसका

प्रा. नंदकुमार गोरे

**जगभरातील छोट्या–मोठ्या कंपन्या सध्या 'चिप' अर्थात सेमीकंडक्टरच्या टंचाईने त्रस्त आहेत. अजून एक वर्षभर तरी ही टंचाई संपणार नाही. भारत आणि तैवानमध्ये सेमीकंडक्टर निर्मितीचा करार झाला आहे.**



जिओ कंपनीच्या नव्या स्मार्टफोनचं उद्घाटन किंवा लॉँचिंग सप्टेंबरच्या दहा तारखेला होणार होतं; परंतु दिवाळीपर्यंत पुढे ढकललं गेलं. त्याचं कारण होतं चिप अर्थात सेमीकंडक्टरची टंचाई. त्यानंतर मोटार कंपन्यांना आपली उत्पादनं थांबवावी लागली. त्यात शेवरोलेसह अन्य कंपन्यांचा समावेश होता. त्याचं कारणही सेमीकंडक्टरची टंचाई हेच होतं.

सेमीकंडक्टरच्या टंचाईमुळे वाहनांच्या किंमतीही सुमारे आठ टक्क्यांनी वाढल्या आहेत. सणासुदीच्या काळात ग्राहक कसा टिकवायचा, असा मोठा प्रश्न प्रमुख कंपन्यांना पडला आहे. जनरल मोटर्ससारख्या जगातील बड्या कंपनीवर उत्पादन थांबवण्याची वेळ येत असेल तर संकट किती गंभीर आहे, याची जाणीव व्हायला हरकत नाही. इंटेल आणि इतर चिप उत्पादकांनी उत्पादनक्षमता वाढवण्याचं काम हाती घेतलं आहे; परंतु प्रत्यक्ष उत्पादन बाजारात दाखल होईपर्यंत म्हणजे किमान वर्षभर तरी चिप्सच्या टंचाईचा सामना करावा लागणार आहे.

मर्सिडीज–बेंझ कंपनीने २०२२ पर्यंत चिपची कमतरता कायम राहण्याची शक्यता वर्तवली आहे. सेमीकंडक्टर पुरवठ्यासंदर्भातल्या जागतिक कमतरतेमुळे पुढच्या वर्षाच्या उत्तरार्धातही व्यवसायावर परिणाम होईल. सर्व आधुनिक चिप्स सिलिकॉन क्रिस्टल्सपासून बनवलेल्या असतात. त्यांचे स्वतंत्र ट्रान्झिस्टर तयार करण्यासाठी लिथोग्राफ केलेले असतात. ट्रान्झिस्टर कोणत्याही समाकलित सर्किटचा मुख्य घटक असतो. ट्रान्झिस्टर जितकं पातळ असेल, तितकी कमी ऊर्जा वापरतं. परिणामी, ट्रान्झिस्टर प्लेसमेंटच्या समान संख्येनं आणि संरचनेसह प्रोसेसर कमी ऊर्जा वापरतो. वापरकर्त्यांसाठी या चिप्सचा मुख्य फायदा म्हणजे ऊर्जेचा वापर कमी करणं. उत्कृष्ट तांत्रिक प्रक्रियेसह चिप्ससाठी कमी ऊर्जा आवश्यक असते. स्मार्टफोनच्या बॅटरी ऊर्जा मोठ्या प्रमाणात वापरतात. म्हणूनच, तिथे सेमीकंडक्टरचं महत्व असतं.अत्याधुनिक वाहनांमध्ये आपण पाहात असलेली सर्व वैशिष्ट्यं एका लहान चिपच्या मदतीनं काम करतात. सेमीकंडक्टर चिप नसेल तर मोटार व्यवस्थित चालणार नाही, अगदी लॅपटॉप, फोन आणि दूरचित्रवाणी संचासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूदेखील चालणार नाहीत. सेमीकंडक्टर चिपच्या या जागतिक टंचाईमुळे नवी वाहनं महाग होत आहेत. एप्रिल महिन्यात अमेरिकेत नवीन वाहनं खरेदी करणाऱ्या १३ टक्के ग्राहकांची किंमत ही मूळ किंमतीपेक्षा जास्त होती. कोरोना आणि टाळेबंदीमुळे गेल्या वर्षी वाहन उद्योगाचं खूप मोठं नुकसान झालं होतं. त्यातून सावरत वाहन उद्योग पुन्हा रुळावर आला आहे, असं वाटू लागलेलं असताना सेमीकंडक्टर चिपची टंचाई निर्माण झाल्यानं या उद्योगाला मोठा फटका बसत आहे. गेल्या तीन–चार महिन्यांपासून वाहनांची मागणी वाढली होती; परंतु आता ग्राहकांनी वपरलेल्या वाहनांची खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. जनरल मोटर्सने म्हटलं आहे की मागील वर्षी मालमोटारींची किंमत कमी होती; परंतु त्यात आता दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे .प्रवासी मोटारींपैकी एसयूव्हीच्या किंमतीत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. फोर्ड आणि फोक्सवॅगन कंपन्या म्हणतात की आगामी काळात यापेक्षा वाईट परिस्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. सध्या या कंपन्यांचं उत्पादन निम्मं झालं आहे. पुढील काळात उत्पादन अजून काही प्रमाणात कमी होऊ शकतं.

संपूर्ण जगात कोरोनामुळे काही कंपन्यांनी मोटारी बनवणं बंद केलं आहे. दुसरीकडे, चिपचं उत्पादनही फारसं होत नाही. त्यातच विमानांच्या उड्डाणांवरही परिणाम झाला आहे. म्हणजे आधीच उत्पादनात कमतरता निर्माण झालेली असताना आता चिप्सच्या आयात–निर्यातीवरही परिणाम झाला आहे. या सर्व कारणांमुळे, आज संपूर्ण इलेक्ट्रॉनिक बाजार, ऑटोमोबाईल बाजार सेमीकंडक्टर चिप्सच्या टंचाईचा सामना करत आहे. सेमीकंडक्टर म्हणजेच चिपच्या कमतरतेचा परिणाम भारतातल्या वाहन आणि उपकरण–गॅजेट–उद्योगावर होत आहे. चिपची कमतरता दूर करण्यासाठी भारत आणि तैवान यांच्यात एक करार होत आहे, ज्या अंतर्गत ही चिप भारतातच तयार करण्याचं योजत आहे. त्यामुळे त्याचे दरही कमी होतील. जगातल्या ८० टक्के चिप तैवान आणि दक्षिण कोरियामध्ये बनवल्या जातात. हा करार प्रत्यक्षात आला तर त्याचा भारतात सकारात्मक परिणाम होईल. तथापि, तज्ज्ञांचं म्हणणं आहे की या करारामुळे चीनचं नुकसान होईल आणि नवा वाद निर्माण होऊ शकतो. हा करार होऊ नये, म्हणून चीन तैवानवर दबाव आणू शकतो. अर्थात आतापर्यंत तैवानने चीनची बरीच बंधनं झुगारून दिली आहेत. इथेही तसं झाल्यास भारतात ७.५ अब्ज डॉलर्स (सुमारे ५५.२३ हजार कोटी रुपये)चा चिपनिर्मिती प्रकल्प सुरू होईल.

टाटा उद्योगसमूहही यात उतरत आहे. तैवान आणि भारतातल्या करारानुसार, फाईव्ह जी डिव्हाइसेसपासून इलेक्ट्रिक कारपर्यंतच्या चिपचं उत्पादन करण्यात येणार आहे. हा करार अशा वेळी होत आहे जेव्हा जगभरातले लोकशाही देश चीनच्या विरोधात उभं राहण्यासाठी आर्थिक आणि लष्करी संबंध वाढवत आहेत. एकीकडे तैवानसोबतचा हा करार फायदेशीर ठरेल तर दुसरीकडे चीनसोबत तणाव वाढण्याची भीती आहे. चीन तैवानला आपलाच एक भाग मानतो. पण तैवान स्वतःला एक स्वतंत्र देश मानतो. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी चिपची पुरवठा साखळी वाढवण्यावर भर दिला. भारताबरोबरच ऑस्ट्रेलिया आणि जपाननेही चिपच्या समस्येवर चर्चा केली आहे. भारतात चिप्स नसल्यामुळे जिओ फोन लॉँच होण्यास विलंब झाला आहे. तो गुगलच्या भागीदारीत बनवला जात आहे. सध्या भारत २४ अब्ज डॉलर्स (सुमारे १.७७ लाख कोटी रुपये) किंमतीचे सेमीकंडक्टर आयात करतो, जे २०२५ पर्यंत सुमारे १०० अब्ज डॉलर (सुमारे ७.३८ लाख कोटी रुपये) पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. भारत–तैवान करार अंमलात आल्यास भारताची आयात कमी होऊन उलट निर्यातीला चालना मिळण्याची शक्यता आहे.मोबाइल फोन,संगणक, लॅपटॉप, स्मार्ट कार, वॉशिंग मशीन, एटीएम, हॉस्पिटल मशीन, स्मार्टफोन अशा सर्व उपकरणांमध्ये त्याची गरज असते. सेमीकंडक्टरंशिवाय ती अपूर्ण आहेत. या चिप्स किंवा सेमीकंडक्टर लहान मेंदू असतात, जे अवघं उपकरण चालवतात. सेमीकंडक्टर चिप सिलिकॉनच्या बनलेल्या असतात. त्या विजेच्या चांगल्या वाहक आहेत. चिप मायक्रो सर्किट्समध्ये बसवलेल्या असतात. सर्व सक्रिय घटक, एकात्मिक सर्किट, मायक्रोचिप्स, ट्रान्झिस्टर आणि इलेक्ट्रॉनिक सेन्सर या चिप्सपासून बनले आहेत. हे सेमीकंडक्टर्स हाय–एंड कॉम्प्युटिंग, ऑपरेशन कंट्रोल, डेटा प्रोसेसिंग, स्टोरेज, इनपुट आणि आउटपुट मॅनेजमेंट, सेन्सिंग, वायरलेस कनेक्टिव्हिटी आणि बरंच काही करण्यात मदत करतात. यामुळे या चिप्स कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम कॉम्प्युटिंग, प्रगत वायरलेस नेटवर्क, ब्लॉकचेन अनुप्रयोग, फाईव्ह जी, आयओटी, ड्रोन, रोबोटिक्स, गेमिंग आणि वेअरेबल्सचा अविभाज्य भाग बनल्या आहेत.

***